# दुष्टांविरुद्ध सुष्टांचा संघर्ष
# अशी ज्ञानेश्वरी



'अशी ज्ञानेश्वरी' मधला एक तणावपूर्ण प्रसंग.

अविनाश पांडुरंग कुलकर्णी का वारकरी कुटुंबात जन्मलेले असतात. त्यांच्यावर चांगले संस्कार झालेले असतात. तेच संस्कार अविनाशची पत्नी सुजाता (निशिगंधा) आणि मुलगी ज्ञानेश्वरी यांच्यावर झालेले असतात. पेशाने लष्करी अधिकारी असलेले अविनाश निवृत्त झाल्यानंतर आपल्या घरी येतात. अविनाशचे मन अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्या प्रवृत्तीचे असते. याबद्दल कामात त्यांच्या पत्नीची मोलाची मदत होत असते. आई-वडील आणि तमाम गावकरी अविनाशच्या बाजूला असतात. मग सुरू होतो भ्रष्टाचाराविरुद्धचा संघर्ष. याच दरम्यान गावात स्वतःला प्रतिष्ठित समजणारे नामदार बबनराव घुगरे-पाटील यांनी भ्रष्टाचाराचा उच्छाद मांडून आता लहान मुलांच्या अनुदानाचा पैसासुद्धा सोडत नाहीत. हे पाहून अविनाश भारत मातेला साक्ष ठेवून पुराव्यासह विरोध करून या अन्यायाविरुद्ध यज्ञकुंड पेटवून लढा पुकारतात ते सहन न झाल्याने बबनराव तीन खतरनाक गुंड अजय, हिंदुराव, सावळ्या यांना पॅरोलवर सोडवून त्यांच्या मार्फत ज्ञानेश्वरीचे अपहरण करवतात.

ते असं कशासाठी करतात?

अविनाशचा लढा यशस्वी होतो? बबनरावांचे काय होते? अजय, सावळ्या, हिंदुरावांचे काय होते? हे पाहण्यासाठी पहा... अशी ज्ञानेश्वरी.

**अशी ज्ञानेश्वरी**

निर्माता : अरविंद नाईक
संगीत : सुरेश वाडकर
पटकथा-संवाद : प्रताप गंगावणे
गीत : जगदीश खेबूडकर



सयाजी शिंदे, नंदू माधव, अक्षता नाईक, 'अशी ज्ञानेश्वरी'मध्ये.



आगामी सासर माझं भाग्याचंमध्ये सुहासिनी देशपांडे, दीपक देऊलकर, अलका कुबल, माणिकराज व चेतन दळवी.